# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**एमएमआरडीएने विस्थापितांसाठी चितळसर मानपाडा येथील अपल्या मालकीचा ५५ हजार ४५१ चौ.मी.भूखंड ठाणे महानगरपालिकेला दिल्यानंतर महानगरपालिकेने येथे बीएसयुपी योजना राबविल्याबाबत**

**(१) १३७२ (२३-१२-२०१४). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील घोडबंदर रोडच्या रुंदीकरणात विस्थापित झालेल्या कुटूंबाच्या पुनर्वसनासाठी एमएमआरडीएने चितळसर मानपाडा येथील अपल्या मालकीचा ५५ हजार ४५१ चौ.मी.भूखंड ठाणे महानगरपालिकेला दिल्यानंतर महानगरपालिकेने अन्य योजनांमधील विस्थापितांचेही पुनर्वसन या जागेवर केल्यामुळे एमएमआरडीएने जमिनीपोटी १२ कोटी ५५ लाख रुपये भरण्याचे आदेश ६ वर्षापूर्वी देऊन आजतागायत ठाणे महानगरपालिकेने भरले नसल्यामुळे जमिनीची मालकी आजही एमएमआरडीएकडेच आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमानुसार विकास प्रस्ताव महानगरपालिकेकडून मंजूर करुन घेताना तो जमीन मालकाने मांडावा लागतो किंवा किमान त्याची एनओसी तरी आवश्यक असते मात्र ही मालकी एमएमआरडीएकडे असताना त्यांचे कोणतेही ना हरकत प्रमाणपत्र न घेताना महानगरपालिकेने स्वतःच इथल्या बीएसयूपी योजनेचा प्रस्ताव बेकायदा पध्दतीने मांडून स्वतःच मंजूर केले असून महानगरपालिकेने तब्बल ८० कोटी रुपये खर्च करुन इथे २१ इमारती उभारल्या असून काही इमारतीचे काम सुरु आहे वा त्यासाठी आणखी काही कोटी रुपये खर्च पडणार असूनही आजही सदरहू बीएसयूपी योजनेची घरे रहिवाशांना मालकी हक्काने मिळालेली नाहीत व परिणामतः नाहीत व रिणामतः केंद्र शासनाच्या मूळ योजनेलाच त्यामुळे हरताळ फासला गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे महानगरपालिकेने बीएसयूपी योजनेंतर्गत करोडो रुपये खर्च करून उभारलेल्या इमारती प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे याप्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१६)** :(१) घोडबंदर रोड, जिल्हा ठाणे येथील रस्ता रुंदीकरणासाठी विस्थापित झालेल्या कुटुंबाच्या पुनर्वसनासाठी चितळसर मानपाडा येथील एमएमआरडीएच्या मालकीच्या ५५ हजार १५१ चौ.मी. व दिनांक १९.०३.१९९९ रोजी २६१५१.०३ चौ.मी. व दिनांक १०.०४.२००४ रोजी २९००० चौ.मी. यासाठी एकंदरीत रुपये १२,५५,५२,०६०/- एवढ्या रकमेस अधिन राहून ठाणे महानगरपालिकेकडे ताबा पावतीद्वारे हस्तांतरण करण्यात आलेले आहे.

तथापि, सद्यस्थितीत सदर जागेची मालकी एमएमआरडीए कडे आहे. परंतु झाल्यानंतर वेळोवेळी राज्य व केंद्र शासनाच्या आढावा बैठकीत सदर योजना नागरी गरीबांची असल्याने सदर रक्कम माफ (waive=off) करण्यासंदर्भात चर्चा झाली असून त्याबाबत महापालिकेमार्फत पाठपुरावा सुरु आहे. सदर बाबतीत अंतिम निर्णय प्राप्त झाल्यानंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(२) सदर भुखंडावर विकास प्रस्ताव मंजूर करताना जमीन मालकाचे नाहरकत प्रमाणपत्र आवश्यक आते. मात्र या प्रकरणी विषयाधीन भूखंडाच्या हस्तांतरणादरम्यान तयार करण्यात आलेली ताबा पावती विचारात घेऊन हौसिंग फॉर डिसहाऊन अंतर्गत आरक्षित असलेल्या सदर भूखंडावर शहरी गरीबांसाठी बी.एस.यु.पी. योजना राबविण्यात येत आहे. सदर भूखंड इमारती व पायाभूत सुविधा निर्माण करणे आवश्यक असून त्यासाठी अंदाजित १७८.३७ अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरांची मालकी सेव्हन पॉफईंट चार्टर प्रोग्रामनुसार रिहिवाशांकडे देणे आवश्यक असल्याने याबाबत एमएमआरडीए व ठाणे महानगरपालिका यांनी सदर प्रकरणी समन्वयाने प्रकरण अंतिम करण्याचे निश्चित केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य परिवहन महामंडळाच्या अर्नाळा, विरार, नालासोपारा व नवघर, वसई आगारातील जमिन वसई विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन सेवेसाठी मिळणेबाबत**

**(२) १८४७ (२३-१२-२०१४). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे १६ लाख लोकवस्तीसाठी वसई-विरार शहर महानगरपालिका परिवहन विभागातर्फे सुमारे ८० टक्के वाहतूक सेवा पुरविण्यात येत असुन वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील राज्य परिवहन महामंडळाची शहरी बस वाहतूक मोठ्या प्रमाणावर कमी झाल्यामुळे विरार, नालासोपारा, वसई रोड (नवघर), वसई आणि अर्नाळा येथील प्रशस्त बस स्टॅन्डमधील जागा विनावापर पडून असल्याने त्यातील काही जागेचा वापर वसई-विरार शहर महानगरपालिका परिवहन विभागाच्या बस स्टॅन्डसाठी उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी वसई-विरार महानगरपालिकेतर्फे राज्य परिवहन महामंडळाकडे ३ वर्षापूर्वी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, विरार, नालासोपारा, वसई रोड (नवघर), वसई आणि अर्नाळा येथील परिवहन महामंडळाच्या बस स्टॅन्डमधील काही जागा वसई-विरार शहर महानगरपालिका परिवहन विभागाच्या बसस्टॅन्डसाठी देण्यास परिवहन महामंडळाकडून टाळण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वसई-विरार शहर महानगरपालिका परिवहन विभागाच्या बस स्टॅन्डसाठी सदरहू जागेपैकी मागणी केलेले क्षेत्र विनाविलंब उपलब्ध करुन देण्याचेदृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) गृह विभागाने दिनांक १४.०७.२०१५ च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास वसई विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन सेवेसाठी दोन वर्षाकरीता प्रायोगिक तत्वावर राज्य परिवहन महामंडळाची जागा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे-नाशिक महामार्गावर नो-पार्कींग झोन केला असतांना दुतर्फा अवजड वहाने पार्कींग केली जात असल्याबाबत

**(३) ११२६५ (०७-०४-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाकण (ता.खेड, जि.पुणे) भागातील मोशी-आळेफाटा राष्ट्रीय व राज्य मार्गावर अपघातात गेल्या ५ वर्षात १ हजाराहून अधिक बळी गेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अपघात घडू नयेत म्हणून पुणे-नाशिक महामार्गावर आळंदी फाटा, तळेगाव चौक, आंबेठाण चौक भागात नो-पार्कींग झोन केला असतांना दुतर्फा अवजड वहाने पार्कींग केली जातात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अवजड वाहनांवर कारवाई करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हा पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकारी यांच्याकडे अनेक वेळा करुनही आतापर्यंत कारवाई न होण्याची कारणे काय आहेत व मागणीच्या अनुषंगाने कार्यवाही केली, असल्यास सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१६) :**(१) पुणे जिल्ह्यामधील मोशी-आळेफाटा राष्ट्रीय व राज्य मार्गावर सन २०१० ते २०१४ या कालावधीमध्ये ७२७ अपघातांमध्ये ४०२ जणांचा मृत्यू झाला आहे.

(२) व (३) जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे शिक्रापूर चाकण तळेगाव रस्त्यावर चाकण पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवजड वाहनांमुळे होणारी वाहतूक कोंडी आणि उपघात रोखण्याकरीता कार्यवाही करण्याची मागणी दिनांक ५.४.२०१५ च्या पत्रान्वये लोकप्रतिनिधींनी केली आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयात पोलीस अधीक्षक पुणे (ग्रामीण) यांना आवश्यक कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे. तसेच, दिनांक २२.३.२०१५ चौक भागात नो-पार्किंगबाबतची अधिसूचना जारी केली आहे.

पुणे नाशिक महामार्गावर आळंदी फाटा. तळेगाव चौक, आंबेठाण चौक परीसरात सन २०१० ते २०१४ कालावणीमध्ये अनधिकृत पार्किंग करणाऱ्या कसुरदार वाहनचालकांवर मोटार वाहन कायदा कलम ११९/१७७ आणि १२२/१७७ अन्वये अनुक्रमे २,८२२ आणि २,३७५ केसेस करण्यात आल्या आहेत.

---

**राज्यातील लाचखोरी रोखण्याबाबत**

**(४) १६९४६ (१०-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लाचलुचपत प्रतिबंधात्मक विभागाने गेल्या चार महिन्यांत पकडलेल्या सुमारे ४१६ लाचखोरांमध्ये सर्वाधिक महसूल आणि गृहविभागातील पोलिस अधिकारी /कर्मचारी असल्याचे माहे मे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त लाचखोरावर कोणती कारवाई केली तसेच लाचखोरी रोखण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०१-२०१६) :**(१) दि. ०१.०१.२०१५ ते दि. ३०.०४.२०१५ या कालावधीत सापळा, अपसंपदा व अन्य भ्रष्टाचार प्रकरणांमध्ये एकूण ४३५ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यात ४३५ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यात ५६९ लोकसेवक अंतर्भूत आहेत. उपरोक्त ४३५ गुन्हांपैकी १०३ गुनहे महसूल विभागातील व ८८ गुन्हे पोलीस विभागातील लोकसेवकांविरुध्द दाखल करण्यात आले आहेत.

(२) व (३) लाचेच्या सापळा प्रकरणी पकडण्यात आलेल्या शासकीय लोकसेवकांवर लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ मधील तरतुदीनुसार गुन्हे दाखल करण्यात आले असून तपास पूर्ण झाल्यानंतर संबंधीतांवर मा. न्यायालयात दोषारोपत्र दाखल करण्यात येते.

राज्यातील लाचखोरी रोखण्याकरिता व जनजागृतीकरिता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येते.

(१) राज्यातील जनतेकरिता ॲन्टी करप्शन ब्युरोमार्फत टोल फ्री क्र. १०६४ ही हेल्पलाईन सुरु करण्यात आली आहे.

(२) www.acbmaharashtra.net हे मोबाईल ॲप कार्यान्वित करण्यात आले असून त्यावर देखील लाचेची मागणी, अपसंपदा व इतर भ्रष्टाचारांचे गुन्हे याबाबत तक्रार केली जाऊ शकते.

(३) ॲन्टी करप्शन ब्युरोच्या फेसबुकवर www.facebook.com/Maharashtra ACB या नावाने अकाऊंट असून त्यावर तक्रार दाखल केली जाते.

(४) ॲन्टी करप्शन ब्युरोची acbmaharashtra.gov.in ही वेबसाईट असून त्यावर ओसीबी मार्फत केलेल्या कारवाईची सर्व माहिती नागरिकांकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

(५) ओसीबी च्या कार्यपध्दतीसंबंधी एफ.एम. रेडिओ, दूरदर्शन यावर परिसंवाद आयोजित करुन जनजागृती करण्यात येते.

(६) ॲन्टी करप्शन ब्युरोमधील अधिकारी व कर्मचारी हे त्यांच्या विभागातील सर्व शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना भेटी देऊन तेथे एसीबीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती देतात. त्याचप्रमाणे, सर्व परिक्षेत्रीय अधिकारी हे त्यांच्य अधिकारक्षेत्रात आठवडे बाजार. एस.टी.स्टँड, रेल्वे स्टेशन, कॉलेज, मंदिर या ठिकाणी जाऊन जनजागृती करतात.

(७) सर्व शासकीय कार्यालयांच्या दर्शनी भागावर ओसीबी संबंधी फोन नंबर, हेल्पलाईन नंबर व वेबसाईट इत्यादी माहितीचा बोर्ड लाऊन प्रदर्शित करण्यात आलेली आहे.

---

## मीरा भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिका प्रशासनाच्या शुन्य नियोजन कारभारामुळे आर्थिक परिस्थिती डबघाईला आल्याबाबत

**(५) १७३२९ (११-०८-२०१५). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिका प्रशासनाच्या नियोजन शुन्य कारभारामुळे आर्थिक परिस्थिती डबघाईला आलेल्या या परिवहनची सेवा पुरती कोलमडली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मीरा भाईदंर परिवहन बसेसच्या मोडलेल्या सीट्स, तुटलेल्या काचा अशी अवस्था असल्याने यातून प्रवास करणे प्रवाशांसाठी फार जिकिरीचे झाले आहे, हे पाहता शासन त्वरीत कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१६) :**(१) नाही.

मिरा-भाईदर महानगरपालिकेची परिवहन सेवा सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्वावर (पी.पी.पी) समाधानकारकरित्या चालू आहे. मात्र शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता. महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमांकडे उपलब्ध असलेल्या बसेसच्या संख्या कमी पडत आहे.

(२) मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमांतर्गत ५० बसेस असून वाढत्या प्रवाशांच्या तुलनेत या बसेस कमी पडतात. हे खरे आहे.

प्रवाशांना चांगल्या दर्जाची प्रवास सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान योजनेअंतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिकेने १०० बसेस मंजूर करण्यात आल्या आहेत.

महापरिपालिकेच्या परिवहन उपक्रमाच्या वाहनतळ पायाभूत सुविधांसाठी जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान योजनेंतर्गत रु. ६.०० कोटी मंजूर करण्यात आले आहेत. महानरगपालिकेकडून वाहनतळ बांधण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरु आहे.

याशिवाय डेपो इन्फ्रास्ट्रक्चर व आय.टी.एस.ची. प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता महानगरपालिकेस केंद्र शासन व जागतिक बँकेकडून रु. १०.०० कोटी मंजूर करण्यात आले आहेत.

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियांनातर्गत मंजूर करण्यात आलेल्या १०० बसेस खरेदीचे कार्यादेश महानगरपालिकेकडून देण्यात आले असून त्यापैकी २८ बसेस परिवहन ताफ्यात समाविष्ट झाल्या आहेत. या बसेस विविध मार्गावर मार्गस्थ करण्यात आल्या आहेत. या बसेस विविध मार्गावर मार्गस्थ करण्यात आल्या आहेत. या बसेस विविध मार्गावर मार्गस्थ करण्यात आल्या आहेत. उर्वरित बसेस माहे जानेवारी, २०१६ पर्यंत महानगरपालिकेच्या परिवहन सेवेत समाविष्ट होणार असून सदर बसेस चालविण्याचे धोरण निश्चित करण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई येथील २६/११ च्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना केंद्राकडून मिळालेला निधी वाटप करण्याबाबत

**(६) १७४७८ (१२-०८-२०१५). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथे २ आय.पी.एस. अधिकाऱ्यांसह २६/११ च्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या ८० जणांसाठी केंद्राने २ कोटी ८० लाख रुपयांचा निधी राज्याला दिला व त्याचे वाटप करण्याची सूचना केली आहे परंतु ७ वर्षानंतरही हा निधी वाटप करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना केंद्राकडून मिळालेला निधी वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुलाबा येथील राजवाडकर स्ट्रीट परिसरातील इमारतीची बनावट कागदपत्रे सादर करुन चार मजले बांधल्याबाबत**

**(७) १९७२१ (१२-०८-२०१५). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुलाबा येथील राजवाडकर स्ट्रीट परिसरातील ६१-६२ क्रमांकाच्या इमारतीची बनावट कागदपत्रे सादर करुन तळमजला अधिक चार मजले बांधल्याप्रकरणी कुलाबा पोलीस ठाण्यातर्फे सुरु असलेली चौकशी पूर्ण करुन ठेकेदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(२) तसेच कर्तव्यात कसूर केल्याबद्दल कोणकोणत्या अधिका-यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०१-२०१६) :**(१) व (२) सदर प्रकरणी तीन आरोपीविरुध्द गु.र.क्र. १७३/२०१४, भा.दं.वि.स. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून दोन आरोपींना मा.न्यायालयाच्या आदेशानुसार लायक जामीनावर मुक्त करण्यात आलेले आहे. तसेच एका आरोपीस अटक करणे बाकी आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जेएनपीटी बंदरातून येणाऱ्या कच्च्या तेलाचा साठा करणाऱ्या टॅकिंग प्रकल्पातून तेल चोरण्याचे प्रकार वाढल्याबाबत**

**(८) १९८४० (१२-०८-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जेएनपीटी बंदरातून येणाऱ्या कच्च्या तेलाचा साठा करणाऱ्या टॅकिंग प्रकल्पातून तेल चोरण्याचे प्रकार वाढल्याचे माहे मे, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तेल चोरांचा तपास स्थानिक पोलीसांनी केला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०१-२०१६) :**(१) आय. ओ.टी.एल. इन्फ्रास्ट्रक्चर ॲन्ड एनर्जी सर्व्हिसेस लिमिटेड, उरण, नवी मुंबई कंपनीने लिझवर घेतलेल्या जागेतून ओएनजीसी कंपनीकडे गेलेल्या कंपनीचे पाईपलाइनवर टॅपींग करुन त्यावाटे होणारा नाफ्ता चोरीचा प्रकार दिनांक १२.०३.२०१५ रोजी उघडकीस आलेला आहे.

(२) व (३) सदर प्रकार मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा सीबीडी यांचे मार्फत उघडकीस आलेला असून त्यासंदर्भात उरण. पो ठाणे कडे गु.र.क्र. ६१/२०१५ भादवि कलम ३७९.४४८.१२० व, ४११,३४ सह पेट्रालियम ॲन्ड मिनरल्स पाईपालाईन्स (ॲक्वीसेशन ऑफ राईट ऑफ युझर इन लँड) ॲमेडमेंन्ट ॲक्ट, २०११ चे कलम १५(२) सह जिवनावश्यक वस्तु कायदा सन १९५५ चे कलम ३.७.१० अन्वये दिनांक १२.०३.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. अटक आरोपीविरुध्द कोर्ट केस क्र. ९२/२०१५ दिनांक ०८.०५.२०१५ रोजी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी उरण कोर्ट येथे दोषारोपपत्र दाखल केलेआहे. सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**साडेसात टन वजनाचा चंदन असलेला ट्रक पनवेल येथून चोरीस गेल्याबाबत**

**(९) १९९६३ (१०-०८-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चैन्नई येथील राहणा-या मोहम्मद जमाल जेहार यांचा साडेसात टन वजनाचा चंदन असलेला ट्रक पनवेल येथून माहे एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास चोरीस गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात काम करणारा संजय नांदगांवकर, हवालदार यांच्यासह अन्य तीन व्यक्तींना अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चंदनचोरी व तस्करी प्रकरणात यापूर्वीही अनेक पोलीसांचा हात असल्याच्या घटना निदर्शनास आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०१-२०१६) :**(१) व (२) होय.
(३) नाही.
(४) कळंबोली पोलीस स्टेशन येथे ट्रक चोरीस गेल्याच्या तक्रारीवरुन गु.र.क्र. ४२/२०१५, भा.दं.वि.कलम ३७९, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणाची चौकशी केली असता शासनाने प्रतिबंधित केलेली रक्तचंदनाची ०७ टन ५०० किलो लाकडे व ०८ टन वजनाची लिंबाची झाडे तामिळनाडू येथून आणल्याचे निष्पन्न झाल्यामुळे सदर गुन्हयामध्ये भा.दं.वि. कलम १२० ब, १०९,११४ सह भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम १४,४२ तसेच मुंबई वन अधिनियम १९४२ चे कलम ६६,८२,१२९ ही कलमे सदर गुन्हयात अंतर्भुत करण्यात आली आहेत.

सदर प्रकरणी पोलीस हवालदार, पोलीस मुख्यालय, नवी मुंबई यांचा या गुन्हयात संबंध आढळून आल्यामुळे त्यांच्यासह उर्वरीत ७ आरोपींना अटक करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगांव जिल्हा परिषदेतील वाहनचालकाच्या प्रतिनियुक्तीसाठी लाच घेताना कनिष्ठ कारकूनास पकडल्याबाबत**

**(१०) १९९८३ (१२-०८-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हा परिषदेतील वाहनचालकाच्या प्रतिनियुक्तीसाठी लाच घेताना सामान्य प्रशासन विभागाचा कनिष्ठ कारकून आणि धुळ्यात पोल्ट्री फार्मच्या नुकसान भरपाईसाठी लाच घेताना पशुसंवर्धन उपायुक्तासह एसीबीच्या पथकाने रंगेहाथ पकडल्याची घटना माहे, मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अटक करण्यात आलेल्या दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०१-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) अ) श्री. ज्ञानदेव बारसू बोंडे, वाहनचालक यांची सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, जळगाव येथून पंचायत समिती, जळगाव येथे प्रतिनियुक्तीचे आदेश काढले प्रकरणी रु. २,०००/- इतकी लाचेची मागणी करुन ती रक्कम स्विकारल्याने श्री. दिपक माणिक भोई, कनिष्ठ सहायक, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, जळगाव यांना दिनांक २०.०५.२०१५ रोजी रंगेहाथ पकडण्यात आले. या संदर्भात त्यांचेविरुध्द जळगाव शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.३०५४/२०१५ कलम ७, १३ (१)(ड) सह १३(२) लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ अन्वये दिनांक २०.०५.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात आरोपीस दिनांक २०.०५.२०१५ रोजी अटक करण्यात आली असून त्यास दिनांक २१.०५.२०१५ रोजी जामीन मिळाला आहे. त्याचेविरुध्द विशेष न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगाव येथे दोषारोप पत्र दिनांक ०६.०८.२०१५ रोजी दाखल केले असून त्याचा विशेष खटला क्र. ३४/२०१५आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

ब) त्याचप्रमाणे, डॉ.कांतीलाल देवरे, रा.जेबापूर,ता.साक्री यांचे सन २००६ मध्ये बर्ड फ्लू या आजाराने अंदाजे १०००० पक्षांचे नुकसान झाले असून सदर नुकसानपोटी शासनाने मंजूर केलेल्या अनुदानाची रक्कम देण्यासाठी लोकसेवक डॉ. परमानंद बागडे, उपायुक्त, जिल्हया पशुसंवर्धन, धुळे व डॉ. रमेश शिंदे, सहायक आयुक्त, पशुसंवर्धन, धुळे यांनी खाजगी इसम श्री. अविनाश बडगुजर यांचेमार्फत लाचेची मागणी करुन सदर रु. १०,०००/- इतकी लाचेची रक्कम खाजगी श्री. अविनाश बडगुजर यांनी दि. २०.०५.२०१५ रोजी तक्रारदार यांच्याकडून स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. या संदर्भात उपरोक्त तीन आरोपीविरुध्द आझादनगर पोलीस स्टेशन, धुळे येथे गुरक्र.३०२९/२०१५ कलम, ७,८ १३ (१)(ड) सह १३ (२) लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयामध्ये आरोपींना दिनांक २१.०५.२२०१५ रोजी अटक करण्यात आली असून मा. न्यायालयाने त्यांना दिनांक २३.०५.२०१५ रोजी जामीन मंजूर केला आहे. संबंधित शासकीय लोकसेवकांविरुध्द न्यायालयात अभियोग दाखल करण्यास सक्षम प्राधिकारी यांची मंजूरी देण्याची बाब विचारधीन आहे.

---

## जायखेडा (ता.बागलाण, जि.नाशिक) येथील पोल्ट्री व्यवसायिकांकडून लाच घेतांना पशुसंवर्धन विभागातील उपायुक्त व सह आयुक्तांला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने अटक केल्याबाबत

**(११) २०००८ (१२-०८-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जायखेडा (ता.बागलाण, जि.नाशिक) येथील पोल्ट्री व्यावसायिकांस भरपाईपोटी दयावयाच्या रकमेसाठी दहा हजार रुपयाची खासगी व्यक्तीच्या मदतीने लाच घेणा-या पशुसंवर्धन विभागातील जिल्हा उपायुक्त व सह आयुक्तांला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने दिनांक २० मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०१-२०१६) :**(१) होय. या प्रकरणी उपायुक्त, जिल्हा पशुसंवर्धन, धुळे व सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन, धुळे यांना दिनांक २१.०५.२०१३ रोजी अटक करण्यात आली आहे.

(२) व (३) डॉ. कांतीलाला देवरे, रा जेबापूर, ता. साक्री यांचे सन २००६ मध्ये बर्ड फ्लू या आजाराने अंदाजे १०००० पक्षांचे नुकसान झाले असून सदर नुकसानीपोटी शासनाने मंजूर केलेल्या अनुदानाची रक्कम देण्यासाठी लोकसेवक डॉ.परमानंद बागडे, उपायुक्त जिल्हा पशुसंवर्धन, धुळे व डॉ रमेश शिंदे, सहायक आयुक्त, पशुसंवर्धन, धुळे यांनी खजगी इसम श्री. अविनाश बडगुजर यांचेमार्फत लाचेची मागणी करुन सदर रु. १०,०००/- इतकी लाचेची रक्कम खाजगी इसम श्री. अविनाश बडगुजर यांनी दि. २०.०५.२०१५ रोजी तक्रारदार यांच्याकडून स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. या संदर्भात उपरोक्त तीन आरोपीविरुध्द आझादनगर पोलीस स्टेशन, धुळे येथे गुरक्र. ३०२९/२०१५ कलम ७,८ १३(१)(ड) सह १३(२) लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम,१९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, सदर गुन्हयामध्ये आरोपींना दिनांक २१.०५.२०१५ रोजी अटक करण्यात आली असून मा. न्यायालयाने त्यांना दिनांक २३.०५.२०१५ रोजी जामीन मंजूर केला आहे. संबंधित शासकीय लोकसंवकांविरुध्द न्यायालयात अभियोग दाखल करण्यास सक्षम प्राधिकारी यांची मंजूरी देण्याची बाब विचारधीन आहे.

---

## ठाण्यातील क्लॅरिअ‍ॅण्ट कंपनीजवळ कोलशेतकडे जाणा-या खाडीकिनारी मोठ्या प्रमाणात बांधकाम कचरा (डेब्रीज) टाकण्यात आल्याबाबत

**(१२) २०३८२ (११-०८-२०१५). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाण्यातील क्लॅरिअ‍ॅण्ट कंपनीजवळ कोलशेतकडे जाणा-या खाडीकिनारी मोठ्या प्रमाणात बांधकाम कचरा (डेब्रीज) टाकण्यात येत असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भराव टाकल्यामुळे येथील खारफुटी नष्ट होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, खाडीकिनारी असलेल्या खारफुटी नष्ट होत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रारी केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार दोषी व्यक्तीवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१६) :**(१) व (२) मौजे कोलशेत येथील स.नं. २३५/१, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२ व स.न. २५३/४, ५,६,७,८,९ अ व ९ ब, १०,११ या जागेवर सीआरझेड कायद्याचे उल्लघन करुन व खार फुटीचे झाडांची कापणी करुन भराव केलेला आहे.
(३) सदर प्रकरणी श्री. प्रताप सरनाईक, विधानसभा सदस्य यांनी दिनांक ०८.०५.२०१५ अन्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे तक्रार केली आहे.
(४) सदर पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ चे कलम १५ व १९ केंद्र शासनाचे सागरी किनारा नियमन अधिसूचना दिनांक १९.०२.१९९१ मधील तरतुदीनुसार संबंधिताविरुध्द कापूरबावडी पोलीस ठाणे येथे गु.र.क. ३०३७/२०१५, दिनांक ०९.०५.२०१५ रोजी उपविभागीय अधिकारी, ठाणे यांच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल केलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीत रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(१३) २०७१८ (११-०८-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका येथील अनेक महत्त्वाच्या अंतर्गत मुख्य रस्त्यांची गेल्या काही वर्षापासून पुरेशा निधी अभावी सुधारणा न केल्यामुळे रस्त्यांची दुरावस्था झाल्यामुळे तेथील नागरिकांना रहदारी व वाहतुकीची गैरसोय होत असल्याबाबतच्या तक्रारी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परिसरातील ३९ अंतर्गत मुख्य रस्त्यांची डांबरीकरणासह सुधारणा करण्यासाठी रुपये २७५३.४९ लक्ष निधीची आवश्यकता असल्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून तथापि सदर खर्च मोठ्या स्वरुपाचा असल्याने १३ व्या वित्त आयोगातून विशेष अनुदान देण्याबाबतची मागणीही स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार भिंवडी-निजामपूर महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१६) :**(१) नाही. .

तथापि, महापौर, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी दिनांक २१.०१.२०१५ अन्वये सचिव, नगर विकास विभाग यांना व दिनांक २६.०२.२०१५ अन्वये मा.मंत्री सार्वजनिक बांधकाम विभाग यांना निवेदन देऊन निधीची मागणी केली आहे.
(२) व (३) सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात रस्ता अनुदान या प्रयोजनाखाली भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेस शासन निर्णय दिनांक ०५.०९.२०१४ अन्वये रक्कम रुपये ७१,४०,७१०/- उपलब्ध करुन दिली आहे.

तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १३.०३.२०१५ अन्वये १३ च्या वित्त आयोगाअंतर्गत निधीची मागणी केली होती. तथापि, १३ च्या वित्त आयोगाअंतर्गत केंद्र शासनाकडून विशेष अनुदान दिले जात नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माथेरान (जि.रायगड) येथे पोलीसांनी कोणतेही कारण नसतांना तरुणांना बेदम मारहाण केल्याबाबत**

**(१४) २०९८४ (१२-०८-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माथेरान (जि.रायगड) येथे पोलीसांनी कोणतेही कारण नसतांना तरुणांना बेदम मारहाण करण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी २०१५ च्या दुस-या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदुनसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०१-२०१६) :**(१) नाही.
(२) सदर प्रकरणी माथेरान पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.०२/२०१५, भा.दं. वि. कलम ३५३, ३४१,३३२,३४ म.पो.का. कलम १२ (अ) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता. सदर गुन्हयातील आरोपींना पोलीस ठाण्यामध्ये मारहाण करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मॅकेन्सी या आंतरराष्ट्रीय संस्थेने राज्यातील पोलीस दलात काम करणा-या कर्मचाऱ्यांच्या विविध बाबींचा अभ्यास करण्याबाबत**

**(१५) २१६९४ (१०-०८-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मॅकेन्सी या आंतरराष्ट्रीय संस्थेने राज्यातील पोलीस दलात काम करणा-या कर्मचा-यांच्या विविध बाबींचा अभ्यास करुन कर्मचा-यांसाठी सन २००६ दरम्यान मार्गदर्शक तत्वे दर्शविणारा अहवाल शासनाला सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनामार्फत अहवाल स्विकारण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आलेली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अहवालातील मार्गदर्शक तत्वांची अमंलबजावणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०१-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) गृह विभागाच्या दिनांक ५.१०.२००६ च्या शासन निर्णयान्वये मेकेन्सी प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याकरिता समिती स्थापन करण्यात आली असून दिनांक १३.१०.२००६ च्या शासन निर्णयाद्वारे मे.मेकेन्झी ॲन्ड कंपनी यांचेकडून प्रकल्प सुधारणा या योजनेच्या अंमलबजावणीचा कृती आराखडा तयार करण्यासाठी अभ्यास गटाकडून शासनास अहवाल सादर करण्यात आला. दि. २९.०८.२००७ रोजी मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत प्रकल्प सुधारणा अहवालातील शिफारशींवर मुद्येनिहास चर्चा होऊन शिफारशींना तत्वत: मान्यता देण्यात आली. सदर चर्चेच्या अनुषंगाने आतापर्यंत ३ शासन निर्णय निर्गमित करण्यात आले असून पोलीस महासंचालक कार्यालयाकडून १० स्थायी आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोरेगाव (मुंबई) येथील फिल्मसिटीमध्ये काही जणांनी गोळ्या झाडल्याबाबत**

**(१६) २२५३८ (१०-०८-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोररेगाव (मुंबई) येथील फिल्मसिटीमध्ये श्रीकांत उर्फ राजू शिदे यांचेवर काही जणांनी गोळ्या झाडल्या घटना दिनांक २३ मे, २०१५ रोजी वा त्या दरम्यान घडली असून त्यामध्ये ते गंभीर जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हल्लेखोर मोटारसायकल वरुन येऊन गोळीबार करुन ते पसार झाले, हे गँगवार असल्याचा संशय आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकारामुळे सामान्य नागरीकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०१-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर गुन्ह्यात गोळीबार करुन पसार झालेल्या आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर प्रकार हा गँगवारचा नसून आरोपींविरुध्द आरे पोलीस ठाणे येथे गु.रं.क्र. ७०/१५, भादवि कलम ३०२, ३०७, ३४, १२० ब सह भाहका कलम ३,२५,२७ सह ३७(१) मुंबई पोलिस कायदा १९५१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील कांदिवली येथील मंडई निरीक्षकाने भाजी विक्री दुकानाचा**
**गाळा नावे करुन देण्यासाठी लाच मागितल्याबाबत**

**(१७) २२५५९ (१२-०८-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या कांदिवली येथील बाजार खाते कार्यालयातील मंडई निरीक्षक बबन पाटील याने भाजी विक्री करणाऱ्या व्यक्तीचे निधन झाल्यानंतर त्याच्या नावे असलेला दुकानाचा गाळा त्याच्या पत्नीच्या नावे करुन देण्यासाठी लाच मागितल्याचे दिनांक ३० मे, २०१५ रोजी व त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बबन पाटील याच्या घरावर छापा टाकला असता त्याच्याकडे मोठा ऐवज सापडल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०१-२०१६) :**(१) श्री. छोटकमल गुप्ता (मयत) यांचे नावावर असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर पालिका मंडई, कांदीवली (प) येथील गाळा क्र. ५० त्यांच्या पत्नीच्या नावे करण्यासाठी मंडई निरीक्षक श्री. बबन पाटील यांनी फिर्यादी यांचेकडे रु. २५,०००/- लाचेची मागणी केल्याबाबत श्री. रमेश गुप्ता यांनी दि. १६.०४.२०१५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग यांचेकडे तक्रार केली आहे. याबाबत दि. १८.०४.२०१५ रोजी तक्रारीची पडताळणी केली असता लोकसेवक श्री. पाटील यांनी फिर्यादीकडे सदर रक्कम दोन टप्प्यात देण्याचे सांगून पहिला टप्पा रु. १५,०००/- घेऊन येण्यास सांगितल्याची बाब पडताळणीमध्ये निष्पन्न झाली आहे. या संदर्भात दि. २९.०४.२०१५ रोजी फिर्यादी श्री. रमेश गुप्ता यांचा सविस्तर जबाब नोंद करुन लोकसेवक श्री. बबन पाटील यांचेविरुध्द गु.र.क्र.२२/२०१५ कलम ७ लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(२) आरोपी लोकसेवक श्री. बबन पाटील यांच्या घरझडतीमध्ये आढळून आलेल्या वस्तुंची अंदाजीत किंमत रु. १,१७,८३०/- अशी आहे. तसेच त्यांच्या नावे विरार येथे २ व गोराई, मुंबई येथे १ अशा तीन सदनिका असल्याची कागदपत्रे मिळून आली आहेत. तसेच, त्यांच्या नावे वसई विकास सहकारी बँक लि./ग्रेटर बँक वसई शाखा/ बँक ऑफ महाराष्ट्र, विरार शाखा इत्यादी बँकामध्ये खाते असल्याचे तसेच त्यांच्या नावे एल.आय.सी. पॉलीसी व राष्ट्रीय बचत पत्र असल्याची कागदपत्रे मिळाली आहेत.

(३) व (४) या संदर्भात लोकसेवक श्री. बबन पाटील यांचेविरुध्द गु.रु.क्र. २२/२०१५ दाखल करण्यात आला असून सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

---

**जोगेश्वरी येथील भोपा रोडवर सुरु असलेल्या नाकाबंदीमध्ये सुमारे सव्वापाच लाखाच्या बनावट चलनी नोटा ताब्यात घेतल्याबाबत**

**(१८) २२५९५ (१२-०८-२०१५). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी येथील भोपा रोडवर सुरु असलेल्या नाकाबंदीमध्ये सुमारे सव्वापाच लाखाच्या बनावट चलनी नोटा, संगणक आणि नेपाळचा नागरिक असल्याचा पासपोर्ट आणि इतर साहित्य पोलीसांनी ताब्यात घेतल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्याअनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०१-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून जोगेश्वरी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. १०३/१५ भा.द.वि कलम ४८९-(अ) (ब) (क) (ड), ३४,१२० (ब) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून मा. महानगर दंडाधिकारी १० वे न्यायालय मुंबई यांच्या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले असुन प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे बुधगांव (ता.मिरज, जि.सांगली) येथील भूमापन कार्यालयातील एक अधिकारी व एक दलाल लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या जाळ्यात सापडल्याबाबत**

**(१९) २३१२७ (१०-०८-२०१५). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बुधगांव (ता.मिरज, जि.सांगली) येथील भूमापन कार्यालयातील एक अधिकारी व एक दलाल लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या जाळ्यात सापडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित दलालाच्या दुकानामध्ये भूमापन कार्यालयातील अनेक महत्वाची कागदपत्रे व नकाशे तसेच शेतक-यांचे अर्ज सापडले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबतीत चौकशी करुन संबंधीतावर काय कारवाई केली आहे व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०१-२०१६) :**(१) मौजे बुधगाव (ता.मिरज, जि.सांगली) येथील भूमापन कार्यालयातील अधिकारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्य जाळयात सापडले हे खरे नाही. तथापि, श्री. शंकर विलास कांबळे, खाजगी इसम या व्यक्तीने श्री. सुरेंद्र दत्तात्रय मालगावे, सेवानिवृत्त प्राध्यापक यांच्या नावाची सिटी सर्व्हे रेकार्डल नोंद करुन देण्याकरिता त्यांचेकडून रु. २,५००/- इतकी लाचेची रककम मागणी करुन ती स्विकारली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) श्री. शंकर विलास कांबळे, खाजगी इसम यांनी लाच स्विकारले प्रकरणी सांगली ग्रामीण पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ४१/२०१५ कलम ८ लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ अन्वये दिनांक ०८.०४.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाच्य संदर्भात विशेष दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

---

**गौरकामत (ता.कर्जत, जि.रायगड) येथे कुंपणाच्या कामावरुन वाद होऊन झालेल्या मारहाणीत अनिल अर्जुन भोईर यांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(२०) २३७३३ (१२-०८-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गौरकामत (ता.कर्जत, जि.रायगड) येथे सवळाराम पिंगळे आणि भाऊ राघों पिंगळे यांच्या कुंपणाच्या कामावरुन वाद होऊन झालेल्या मारहाणीत कुंपणाचे काम करणा-या अनिल अर्जुन भोईर यांचा दिनांक १० मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मृत्यू प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार नाहक बळी गेलेल्या अनिल भोईर यांच्या नातेवाईकांला कांही आर्थिक मदत करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०१-२०१६) :**(१)होय.

(२) सदर प्रकरणी अनिल अर्जुल भोईर यांच्या पत्नीने केलेल्या फिर्यादीवरुन कर्जत पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ७६/२०१५, भा.दं.वि. कलम ३०२, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये दिनांक ११ मे, २०१५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर प्रकरणाची चौकशी केली असता अनिल भोईर याचा भाऊ व राघव सिताराम पिंगळे व त्यांची पत्नी वाद चालू होता. या जागेवर राघव पिंगळे व त्यांची पत्नी यांनी सदर जागेत कंपाऊड घालण्यासाठी अनिल भोईर यांना मतदीला बोलावले होते. त्यामुळे या प्रकरणाचा राग धरुन नितीन पिंगळे, गणेश पिंगळे व सावळाराम पिंगळे यांनी अनिल भोईर याला हाताबुक्क्याने मारहाण करुन व डोक्यात काठी घालून ठार केले.

वरील तिन्ही आरोपीना अटक करण्यात आली असून त्यांना न्यायालयातील कोठडी देण्यात आली आहे, सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्हयातील तालक्यांच्या शहरी भागात अनधिकृत कॅसिनो गेम (खेळ) चे अड्डे वाढल्याबाबत**

**(२१) २४६५२ (१२-०८-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील तालुक्यांच्या शहरी भागात पोलीस आणि महसूल यंत्रणेच्या दुलर्क्षा मुळे अनधिकृत कॅसिनो गेम (खेळ) चे अड्डे वाढले असून कॅसिनो गेम जुगारा बद्दल वारंवार जिल्हा पोलिस अधिक्षक सिंधुदुर्ग यांच्याकडे माहे एप्रिल, २०१५ पासून लेखी तक्रारी करुन सदर अड्डे बंद करावेत अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०१-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर येथील पोलीसांना घरे उपलब्ध करून देण्याबाबत**

**(२२) २५८५२ (१२-०८-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील पोलीस निवासस्थाने १९१६ साली निर्माण केलेली असून या वास्तू तांत्रिक दृष्ट्या धोकादायक व जीर्ण झाल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच माळशिरस (जि.सोलापूर) येथील पोलीस वसाहतीची दुरवस्था झाल्याने ५१ कर्मचारी बेघर झाले असून या कर्मचाऱ्यांना भाड्याच्या घरात रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलीसांना घरे उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१६) :**(१) व (२) सोलापूर जिल्हयातील माहशिरस पोलीस ठाण्याची २६ शासकीय निवासस्थाने १९९६ पूर्वीची असून ती नादुरुस्त अवस्थेत आहेत. ९ पोलीस कर्मचारी अकलूज पोलीस लाईनमध्ये रहात असून इतर कर्मचारी खाजगी निवासस्थानात वास्तव्य करीत आहेत.

(३) माळश्रिरस (जि.सोलापूर) येथे पोलीस कर्मचाऱ्यांसाठी २१ निवासस्थाने बांधकामासाठी खर्चाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी देण्यात येऊन निधीची उपलब्धता लक्षात घेवून मान्यता देण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सेलू पंचायत समितीचा (जि.परभणी) प्रभारी गटविकास अधिका-यास घरकुल अनुदानाच्या मंजूरीसाठी लाच घेतांना पकडल्याबाबत**

**(२३) २६५८८ (१२-०८-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू पंचायत समितीचा (जि.परभणी) प्रभारी गटविकास अधिकारी प्रभाकर शिंदे यांना घरकुल अनुदानाच्या दुस-या हप्त्याच्या मंजूरीसाठी सहा लाभार्थ्यांकडून १० हजार रुपयांची लाच घेतांना दि.१५.१.२०१५ रोजी वा सुमारास अटक करण्यात आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०१-२०१६) :**(१), (२) व (३) श्री.प्रकाश सोपानराव दूधवडे, रा.गवा, पो.कुपटा, ता.सेलू, जि.परभणी यांची चुलत आजी व गावातील इतर पाच लाभार्थी मंजूर केलेल्या घरकुल योजनेचा दुसरा हप्ता मिळणेसाठी रु. ५,०००/- इतकी लाचेची मागणी करुन ती पंचासमा स्विकारली असता लोकसेवक श्री. प्रभाकर नारायण शिंदे, प्रभारी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेलू यांना रंगेहाथ पकडण्यात आले. या संदर्भात श्री. शिंदे यांचेविरुध्द पोलीस स्टेशन नवामोंढा, जि. परभणी येथे गु.र.क्र.३००३/२०१५, कलम ७, १३(१)(ड)सह १३ (२) लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ अन्वये दि. १६.०१.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचे अनुषंगाने विशेष न्यायालय, परभणी येथे दि. ०९.०६.२०१५ रोजी दोषारोपत्र दाखल करण्यात आले असून त्याचा विशेष खटला क्र. ०५/२०१५ आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तसेच आरोपी लोकसेवक यांना दि. १६.०१.२०१५ पासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

---

**नांदेड येथील भूमी उपअधिक्षकास लाच घेतांना पकडल्याबाबत**

**(२४) २६६१४ (१२-०८-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील भूमी अभिलेख कार्यालयातील, भूमी उपअधिक्षक मोहन मधुसुदन दासखेडकर यांना १५ हजार रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने रंगेहात पकडल्याचे दिनांक ११ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०१-२०१६) :**(१), (२) व (३) तक्रारदार यांचे मुलीवर झालेल्या अत्याचार संदर्भात मुक्रमाबाद पोलीस स्टेशन, जि. नांदेड येथे दाखल गु.र.क्र.९४/२०१४ मधील घटना ज्या शेतात घडली होती त्या ठिकाणचा नकाशा काढून देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे

रु.१०,०००/- इतकी लाचेची मागणी केल्याची फिर्याद तक्रारदार यांनी दिनांक ०३.१२.२०१४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांच्याकडे केली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने लाचेची मागणी केल्याचे पडताळणीमध्ये निष्पन्न झाले असल्याने श्री. मोहन मधुसुदन दासखेडकर, परिरक्षण भूमापक, भूमी उपअधीक्षक कार्यालय, मुखेड यांचेविरुध्द दिनांक १०.१२.२०१४ रोजी पोलीस स्टेशन, मुखेड येथे गु.र.क्र. ३०३३/२०१५ कलम ७ लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात लोकसेवक श्री. दासखेडकर यांना दिनांक १२.०१.२०१५ रोजी अटक करण्यात आली असून सद्यस्थितीत ते जामीनावर मुक्त आहेत. या प्रकरणी मा. विशेष न्यायालय, मुखेड येथे दोषारोपपत्र दिनांक २४.०४.२०१५ रोजी दाखल करण्यात आले असून त्याचा विशेष खटला क्र. ०६/२०१५ आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तसेच श्री. दासखेडकर यांना दिनांक २०.०२.२०१५ पासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

---

## खोपोली (जि.रायगड) शिक्षण मंडळाच्या प्रशासकीय अधिका-याला शिक्षिकेकडून लाच घेताना अटक करण्यात आल्याबाबत

**(२५) २७०८३ (१२-०८-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली (जि.रायगड) शिक्षण मंडळाच्या प्रशासकीय अधिका-याला अपंग शिक्षिकेकडून अडीच लाखाची लाच घेताना माहे जून, २०१५ मध्ये वा त्यासुमारास अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
तदनुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०१-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) सौ.उज्वला सुभाष मदन, प्राथमिक शिक्षीका, खोपोली नगर परिषद मंडळांर्गत शाळा क्र. ८, लवजी यांच्या ५ व्या वेतन आयोगाच्या पगारातील फरक काढून दिल्याबद्दल व बी.एड. पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षित वेतनश्रेणी कायम करण्याकरिता सहकार्य करण्यासाठी श्री.भास्करराव शंकरराव सुर्यवंशी, प्रशासकीय अधिकारी, नगर परिषद शिक्षण मंडळ, खोपोली, जि.रायगड यांनी तक्रारदार सौ.मदन यांचेकडे रु. २,५०,०००/- इतक्या रकमेची मागणी करुन ती पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांना दि. १०.०६.२०१५ रोजी खोपोली रेल्वे स्टेशन, प्लॅटफॉर्म नं. १ वर रंगेहाथ पकडण्यात आले. या संदर्भात कर्जत रेल्वे पोलीस स्टेशन येथे गुरक्र. ३००१/२०१५, कलम ७, १३ (१) (ड) सह १३ (२) अन्वये दि. ११.०६.२०१५ रोजी अटक करण्यात आली होती. सद्यस्थितीत ते जामीनावर मुक्त आहेत. सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.

श्री. भास्करराव सुर्यवंशी यांचे नवीन पनवेल येथील घराच्या झडतीमध्ये रु.३,३८,९५०/- किंमतीची मालमत्ता, बँक ऑफ इंडिया शाखा पनवेल येथील लॉकरमध्ये रु.३,००,०००/- व रु.६,५४,४२०/- किंमतीचे सोन्याचे दागिने आढळून आले. श्री.सुर्यवंशी यांना शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई यांच्या दिनांक १६.०७.२०१५ च्या आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

---

**मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाच्या अधिका-यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चौकशी करण्याबाबत**

**(२६) २८२०४ (०५-११-२०१५). श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ग्रँण्टरोड येथील शितल इस्टेटच्या ब्राम्हणवाडीतील ११ चाळीच्या पुनर्विकासासाठी मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाने दिनांक २८ जून, २०१२ रोजी क्र.R/Noc/G १७०१/३४५९ दिलेल्या नियमबाह्य प्रमाणपत्रासंदर्भातील संबंधित अधिकारी व अभियंत्यावर कारवाई करण्याबाबत दिनांक ८ नोव्हेंबर, २०१२ पासून ४ मे, २०१५ पर्यंत राज्यसभा सदस्य हुसेन दलवाई तसेच लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, मुख्य सचिव (गृह विभाग) पोलीस महासंचालक (लाचलुचपत प्रतिबधंक विभाग) यांच्याकडे अनेक लेखी तक्रारी दाखल केलेल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार दोषीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) व (४) विषयांकित प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या गुप्त चौकशीचा अहवाल लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून मागविण्यात आला आहे तसेच, ब्राम्हणवाडी भाडेकरुन संघाने दिनांक ०७.०२.२०१४ रोजी उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा प्राधिकरण यांचेकडे केलेल्या प्रथम अपिलावर अंतिम निर्णय झाला असल्यास त्याचा तपशील उपलब्ध करुन देण्याबाबत गृहनिर्माण विभागास कळविण्यात आले आहे. उपरोक्त दोन्ही मुद्याबाबत माहिती प्राप्त होताच उघड चौकशी संदर्भात अंतिम निर्णय घेण्यात येईल.

---

**मुंबईतील म्हाडाच्या धोकादायक इमारतीच्या पुनर्विकासाबाबत**

**(२७) २८२२३ (०४-११-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत म्हाडाच्या ४० ते ५० वर्षापूर्वीच्या ५६ वसाहती असून यापैकी अनेक इमारती मोडकळीस आल्या असून त्या पुर्नविकासास पात्र आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील म्हाडाच्या धोकादायक इमारतीच्या पुनर्विकासाबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०५-०२-२०१६) :**(१) व (२) मुंबईतील म्हाडा वसाहतींमधील इमारतींचा पुनर्विकास बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली च्या विनिमय ३३ (५) मधील तरतुदीनुसार करण्यात येतो. त्यानुसार शासनाने दि. ०८.११.२०१३ रोजीच्या अधिसूचनेन्वये विनिमय ३३ (५) मध्ये केलेल्या सुधारणांनूसार म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाकरीता २.५ ऐवजी ३.०० इतका चटईक्षेत्र निर्देशांक लागू केला आहे. त्यानुसार म्हाडाकडे प्राप्त परिपूर्ण प्रस्तावाच्या अनुषंगाने म्हाडाकडून कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे वागळे इस्टेट येथील पोलीस निरिक्षकास लाच घेतांना पकडल्याबाबत**

**(२८) २८२२९ (०५-११-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.ठाणे)येथील रासायनिक कंपनीतील रॉकेल व फिनेल मधील भेसळी विरुध्दच्या कारवाई दरम्यान जप्त केलेले वाहन सोडण्यासाठी लाच घेताना ठाणे वागळे इस्टेट येथील पोलीस निरिक्षक शहाजी जाधव यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक ४ ऑगस्ट, २०१५ दरम्यान पकडून वर्तकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास याप्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०१६) :**(१) वाडा (जि.ठाणे) येथील रासायनिक कंपनीतील रॉकेल व फिनेल मधील भेसळी विरुध्दच्या कारवाई दरम्यान जप्त केलेल वाहन सोडविण्यासाठी रु.५०,०००/- एवढी लाचेची रक्कम श्री. उदय शंकर कोरे यांचेमार्फतीने दिनांक २८.०१.२०१५ रोजी स्विकारल्या प्रकरणी वागळे इस्टेट पोलीस स्टेशन येथे गुरक्र. ०२/२०१५ लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७,१२,१३(१) (ड) सह १३(२) अन्वये दिनांक २९.०१.२०१५ रोजी १) श्री.शहाजी जाधव, पोलीस निरीक्षक, २) श्री.जयसिंग राजपूत, पोलीस हवालदार,

३) सुरेश पाटील, पोलीस हवालदार, ४) श्री.उदय कोरे, पोलीस हवालदार यांचेविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(२) व (३) उपरोक्त चारही आरोपींना दिनांक ०२.०२.२०१५ पर्यंत पोलीस कस्टडी मंजूर करण्यात आली आहे. उपरोक्त आरोपींना पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांच्या दिनांक ३१.०१.२०१५ च्या आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. तसेच, त्यांचेविरुध्द मा.विशेष न्यायालयात अभियोग दाखल करण्यास मंजूरी देणेबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्तरावर विचाराधीन आहे.

---

**कोल्हापुर येथे उच्च न्यायालयाचे खंडपीठ सुरु करण्याबाबत**

**(२९) २८५२० (२१-०१-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर येथे उच्च न्यायालयाचे खंडपीठ मंजुरीचा ठराव दिनांक १२ मे, २०१५ च्या मंत्रीमंडळ बैठकीत मंजुर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाच महीन्यांनंतर सुध्दा सदरचे खंडपीठ सुरू होवू शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर खंडपीठ मंजुरीसाठी कोल्हापुरसह सांगली, रत्नागिरी, सिधुदुर्ग, सातारा व सोलापुर या पाच जिल्ह्यातील वकीलांनी तीव्र आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर खंडपीठ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१६) :**(१) दिनांक १२ मे, २०१५ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाने फिरते खंडपीठ (सर्किट बेंच) स्थापन करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) राज्यात उच्च न्यायालयाचे नवीन खंडपीठ स्थापन करण्यास बराचसा कालावधी लागू शकतो, ही बाब विचारात घेवून प्रलंबीत खटल्यांची संख्या, मुंबई शहरापासूनचे अंतर व लोकसंख्या या निकषांवर कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ (सर्किट बँच) स्थापन करण्यास मान्यता देण्यात याची तसेच पुणे येथेही मुंबई उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ (सर्किट बँच) स्थापन करण्याबाबत सकारात्मक विचार करण्यात अशी शिफारस

करण्याबाबतचा निर्णय दिनांक १२मे, २०१५ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. ही शिफारस मा. मुख्य न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांना दि.१७ जुलै २०१५ रोजीच्या शासन पत्रान्वये करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील विमानतळ विस्तारीकरणाबाबत**

**(३०) २८६७२ (१३-०१-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथील विमानतळ विस्तारीकरण करुन विमान सेवा सुरु करण्याची मागणी विविध संघटना, उद्योजक यांनी वेळोवेळी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन विभागाची जमीन विमानतळ प्राधिकरणाला देण्याबाबत प्रस्तुत लोकप्रतिनिधी यांनी मा.वने मंत्री, यांना पत्र लिहुन विनंती केली आहे, हे सुध्दा खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर विमानतळ लवकरात लवकर सुरु करण्यासाठी शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१६) :**(१) व (२) होय.
(३) दिनांक २६.६.२०१५ रोजी मा. मंत्री, नागरी उड्डाण, भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कोल्हापूर विमानतळ विस्तारीकरणाचा पाठपुरावा करण्यात आला असून सदर बैठकीत भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाने कोल्हापूर विमानातळाच्या विस्तारीकरणाचे काम लवकरात लवकर हाती घेण्याचे मान्य केले असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे

---

**गाडगेनगर (जि.अमरावती) पोलिस ठाण्यातील सहाय्यक पोलिस निरिक्षकावर चंदन चोराने हल्ला केल्याबाबत**

**(३१) २९५७५ (२१-०१-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गाडगेनगर (जि.अमरावती) पोलिस ठाण्यातील सहाय्यक पोलिस निरिक्षक चंदन चोराचा पाठलाग करुन त्यांना पकडण्याचा प्रयत्न करीत असतांना चोरटयाने त्यांचेवर हल्ला केला असल्याचे दिनांक ११ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील चंदन चोराला पकडण्यात पोलिसांना अपयश आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०१६) :**(१) होय.
(२) सदर गुन्ह्याच्या तपासात अमरावती ग्रामीण हद्दीतील चंदन चोरीचे गुन्हे करणाऱ्या आरोपीतांकडून चंदन चोरीचे गुन्हे करणाऱ्या आरोपीतांकडून चौकशी करण्यात आली असून अद्याप काही माहिती मिळाली नाही. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(३) सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, गाडगेनगर तपोवन भागात पेट्रोलिंग करत असताना दोन अनोळखी इसम मोटार सायकल वरुन चंदनावे लाकूड घेऊन जात असता त्यांना पकडण्याचा प्रयत्न करत असताना त्या इसमांनी सहायक पोलीस निरीखकावर कोयत्या ने हल्ला केला. सदर प्रकरणी गाडगेनगर पोलीस स्टेशन येथे अप. क्र. ३४४/२०१५ कलम, ३५३,३०७, ३४ भां.दं. वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे येथे नवीन विमानतळ उभारण्याबाबत

**(३२) २९६४१ (२१-०१-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे नवीन विमानतळ उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विमानतळ उभारण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) राजगुरुनगर पुणे येथे नवीन विमानतळ उभारणीसाठी अद्यापपर्यंत ६ ठिकाणी जागांची पाहणी करण्यात आली आहे. त्यापैकी प्रथमदर्शनी एक जागा योग्य असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर जागेची सीमा निश्चित करण्याकरिता सर्वेक्षण करण्यासाठी भारतीय विमानपत्तन प्राधिकरणास निर्देश देण्यात आले आहेत. सदरचा सर्वेक्षण अहवाल फेब्रुवारी, २०१६ मध्ये अपेक्षित आहे.

---

## राज्याच्या लोकायुक्त कार्यालयातील उप लोकायुक्ताचे पद भरण्याबाबत

**(३३) २९६७२ (२१-०१-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या लोकायुक्त कार्यालयात गेले १० महिने उप लोकायुक्त पद रिक्त असल्याने नागरिकांच्या तक्रारीची कामे प्रलंबित असल्याचे माहे ४ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उप लोकायुक्ताचे पद भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१६) :**(१), (२) व (३) लोक आयुक्त श्री. स.ल. टहलियानी आणि उप लोक आयुक्त श्री.शैलेश कुमार यांनी अनुक्रमे दिनांक २४ ऑगस्ट, २०१५ आणि दिनांक ५ डिसेंबर, २०१५ रोजी कार्यभार स्वीकारलेला आहे. महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ च्या कलम १९ अन्वये प्रबंधक व अतिरिक्त प्रबधक या दोन पदांना काही मर्यादित अधिकार प्रत्यायुक्त करण्यात आलेले असल्याने सदर कालावधीत या मर्यादित अधिकारांचा वापर करुन नागरिकांच्या फक्त गाऱ्याण्यांसंबंधीच्या तक्रारी, प्रबंधक व अतिरिक्त प्रबंधक यांच्याकडून हाताळण्यात आल्या आहेत.

---

**अकोला, चंद्रपूर, अमरावती, यवतमाळ या राज्याअंतर्गत विमानसेवा सुरु करण्याबाबत**

**(३४) २९७१४ (२१-०१-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला, अमरावती आणि यवतमाळ येथील जवाहलाल दर्डा विमानतळाच्या धावपट्ट्यांचा विकास करण्यासाठी मा.वित्त मंत्री महोदयांनी आढावा बैठक घेतल्याचे दिनांक १४ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोला, चंद्रपूर, अमरावती, यवतमाळ या राज्याअंतर्गत विमानसेवा सुरु करण्याच्या प्रस्तावास मान्यता देऊन त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) राज्यातील सर्व विमानतळे हवाई मार्ग जोडण्यासाठी सर्वसमावेशक धोरण ठरवण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**मुंबईतील सागरी किनारपट्टीच्या सुरक्षेची जबाबदारी असलेल्या २३० पोलीसांना पोहताच येत नसल्याबाबत**

**(३५) २९८६१ (२१-०१-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अतिमहत्वाच्या सागरी किनारपट्टीच्या सुरक्षेची जबाबदारी असलेल्या तटरक्षक दलाच्या ४५० पोलीसापैकी २३० पोलीसांना पोहताच येत नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अतिशय महत्वाच्या किनारपट्टीच्या सुरक्षेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१६) :**(१) जुलै २०१५ मध्ये सागरी पोलीस ठाणेस कार्यरत असलेल्या एकूण ६९२ अधिकारी/अंमलदारापैकी ११९ पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना पोहता येत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) सागरी पोलीस ठाणेस कार्यरत असलेल्या परंतू पोहता न येणाऱ्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांना पोहण्याचे प्रशिक्षण देण्याकामी कालबाध्द कार्यक्रम आयोजित केला आहे. पोहता न येणाऱ्या पोलीस अंमलदार ६० यांना नौदल जलतरण तलाव आणि ३० पोलीस अंमलदार यांना मुंबई पोलीस जलतरण तलाव येथे पोहण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. उर्वरित पोहता न येणाऱ्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांच्यासाठी पोहण्याचे प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे. पोहता येणाऱ्या पोलीस अधिकारी / अंमलदार यांनाच पोलीस नौकांवर कर्तव्य देण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माणगांव (जि.रायगड) येथील तहसिलदार यांच्यावर वाळू माफीयांनी केलेल्या हल्ल्याबाबत**

**(३६) २९९७३ (२१-०१-२०१६). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगांव (जि.रायगड) यांना दिनांक १७ ऑक्टोंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास रात्री अवैद्य वाळू वाहतूक करणारी वाहने अडवत असतांना अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रक चालकानी श्री.महेश सागर, तहसिलदार यांच्यासह त्यांच्या सहकारी यांच्या अंगावर भरधाव ट्रक घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत ट्रक चालक व वाळू माफियांना अटक केली असून पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०२-२०१६) :**(१) होय.

(२) सदर प्रकरणी माणगांव पोलीस स्टेशन येथे कॉ. गु.रु. नं. १४६/२०१५ भादंविस कलम ३०७,३५३,५०६,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी ४ आरोपींना अटक केली असून सध्या आरोपी जामीनावर आहेत. सदर आरोपीविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे . तसेच आरोपींवर सीआरपीसी कलम १०७ प्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धुळे तालुक्यातील गोताणे फाट्याजवळ झालेल्या अपघाताबाबत

**(३७) ३०३६१ (२१-०१-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे तालुक्यातील गोताणे फाट्याजवळ अपघात होऊन चार वर्षीय बालकाचा मृत्यू झाला व दोन जण गंभीर जखमी झाल्याचे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारंवार होणारे अपघात थांबविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर रस्ता सरळ असून, या रस्त्यांवर वारंवार अपघातांच्या घटना झालेल्या नाहीत. तसेच सप्टेंबर, २०१५ मध्ये झालेला अपघात हा वाहन चालकाच्या चुकीमुळे झाला आहे.

गौताणे फाट्याजवळ गतिरोधक बांधण्याच्या सूचना देण्यात आल्या असून या रस्त्यावरील हजनाळे बारी येथे तात्पुरते पोलीस मदत केंद्र उभारण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्हयात पेसा या कायद्यामुळे बिगर आदिवासी तरूणांच्या नोकऱ्या धोक्यात आल्याबाबत

**(३८) ३०५६२ (२२-१२-२०१५). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेसा या नव्या कायद्यांतर्गत पालघर जिल्हयात अनुसूचित क्षेत्रातील सुनिश्चित केलेल्या १२ संवर्गातील पदे स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधूनच भरण्यात यावीत तसेच आदिवासी भागात सध्या कार्यरत असलेल्या बिगर आदिवासी कर्मचाऱ्यांच्या अन्य भागात बदल्या कराव्यात असे आदेश दिनांक ५ मार्च, २०१५ रोजीच्या परिपत्रकात नमूद करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे आदिवासी भागात सेवा देणाऱ्या बिगर आदिवासी कर्मचाऱ्यांना टप्प्याटप्प्याने हटविले जाऊन यापुढे नोकर भरतीतही त्यांना नोकरीची द्वारे कायमस्वरूपी बंद होणार असल्याने बिगर आदिवासी समाजामध्ये आदिवासी भागात रहावयाचे की आपले वडिलोपार्जित गाव व घर सोडून परक्या ठिकाणी जायचे ही समस्या निर्माण झाल्याने प्रचंड नाराजी पसरली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१६) :**(१), (२) व (३) मा. राज्यपाल यांच्या दि. ९.६.२०१४ दि.१४.८.२०१५ दि. ३१.१०.२०१४ व दि. १३.६.२०१५ च्या अधिसूचनांनुसार अनुसूचित क्षेत्रातील सुनिश्चित केलेली १३ पदे स्थानिक अनुसूचित जमातीधील उमेदवारांमधून भरण्याचे आदेश आहेत. त्यानुसार अनुसूचित क्षेत्रातील व अनुसूचित क्षेत्राबाहेरील पदे भरण्याबाबत शासन निर्णय दि.५.३.२०१५ व दि. २६.६.२०१५ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच अनुसूचित क्षेत्राबाहेरील पदे आरक्षण अधिनियम २००१ मधील कलम ४(२) मध्ये नमूद करण्यात आलेल्या आरक्षण टक्केवारीनुसार भरण्यात येणार आहेत. त्यामुळे बिगर आदिवासी कर्मचाऱ्यांची नोकर भरती बंद होणार आहे ही वस्तुस्थिती नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळकोट(जि.लातूर) तालुक्यासाठी न्यायालय स्थापन करण्याबाबत**

**(३९) ३०७४० (२१-०१-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हातील जळकोट तालुका निर्माण होऊन १५ वर्षे झाले तरी येथील नागरिकांना न्यायालयीन कामकाजासाठी दुसऱ्या तालुक्यात जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आठवडयातून एक दिवस जळकोट येथे ग्राम न्यायालय चालते त्या न्यायालयात जाण्यातच नागरीकांचा वेळ जातो व निकाला अभावी प्रकरणे प्रलंबित राहून जातात, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने जळकोट तालुक्यात न्यायालय स्थापनेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत जळकोटी येथील न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात अल्प प्रकरणे प्रलंबित आहेत. ती निकाली काढण्यासाठी ग्रामन्यायालय सक्षम आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील केळापूर मार्गावरील टोलनाक्याजवळ पोलीसांनी जनावरांची अवैध वाहतूक करणारे वाहन जप्त केल्याबाबत**

**(४०) ३१०९८ (२१-०१-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील केळापूर मार्गावरील टोलनाक्याजवळ पोलीसांनी जनावरांची निदर्यपणे अवैध वाहतूक करणा-या वाहनासह एकूण चार लाखांचा मुददेमाल जप्त केला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी पांढरकवडा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३२०१/२०१५, प्राणी संरक्षण कायदा, १९६० कलम ११ सह मुंबई पोलीस कायदा कलम ६६/१९२, मोटार वाहन वाहन मालक व अन्य दोघांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. दि.१९.१२.२०१५ रोजी चारही आरोपींविरुध्द मा.न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील नऊ शहरात हवाई सेवा सुरु करण्याचा शासनाच्या निर्णयाबाबत**

**(४१) ३११९५ (२१-०१-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नऊ शहरात हवाई सेवा सुरु करण्याचा निर्णय राज्य शासनाने ऑगस्ट, २०१५ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोणकोणत्या शहरात हवाई सेवा सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे,
(३) असल्यास, हवाई सेवा सुरु करण्याच्या कामाची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१६) :**(१), (२) व (३) राज्यातील विविध शहरे नियमित हवाईसेवेद्वारे जोडण्याबाबत केंद्र शासनाच्या प्रस्तावित धोरणाशी सुसंगत राज्य शासनाचे धोरण आखण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

**महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न सोडविण्याबाबत**

**(४२) ३१४८३ (२१-०२-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न सोडविण्यासाठी आतापर्यंत शासनाने सुमारे साडेचार कोटी रुपये खर्च झालेले असून सर्वोच्च न्यायालयामध्ये खंबीर बाजू मांडण्यासाठी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे सप्टेंबर, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात तसेच वारंवार आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सीमा प्रश्नासाठी मंत्रालयात स्वतंत्र खाते स्थापन करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ ऑगस्ट, २०१५ रोजी तसेच वारंवार मा.मुख्यमंत्री यांचेकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच वर्षानुवर्षे प्रलंबित असलेला सीमा प्रश्न सोडवून सीमा भागातील मराठी भाषीकांना न्याय मिळवून देण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरवा केला वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०१६) :**(१) व (२) होय.

(३) भीमा प्रश्नासाठी स्वतंत्र खाते स्थापन करण्याच्या मागणीचा साकल्याने विचार केल्यानंतरही सीमा प्रश्नाचा प्रभावी पाठपुरावा करुन विषयाला चालना देण्यासाठी मा. मंत्री सहकार यांची समन्वयक मंत्री म्हणून दि. १५/१२/२०१५ च्या आदेशान्वये नियुक्त करण्यात आली आहे.

महाराष्ट्र -कर्नाटक सीमा प्रश्न सोडविण्यासाठी अभ्यासगटाची नियुक्ती करुन सर्वमान्य तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने दि. ०२/०५/२००० रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चाधिकार समिती स्थापन करण्यात आली, सीमा प्रश्न सामंजस्याने सोडविण्यासाठी केंद्र शासन व कर्नाटक शासन यांच्याशी विविध पातळीवरुन निकराचे प्रयत्न करुनही यश न आल्याने, दिनांक ०६/११/२००२ च्या बैठकीत उच्चाधिकार समितीने मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याची शिफारस केली. दि. १२/०२/२००३ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत शिफारस मान्य करण्यात आली. न्यायिक प्रकरणात सल्ला देण्यासाठी प्रा.एन.डी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दि.०३/०३/२००३ रोजी तज्ञ समिती स्थापन करण्यात आली.

उपरोक्त पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १३१ (ब) अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयात दि. २९/०३/२०१४ रोजी दावा क्र. ४/२००४ दाखल केला आहे. दाव्यात महाराष्ट्र राज्याची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी ८ अनुभवी व निष्णात वकीलांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. दि. १३/१२/२०१२ रोजी झालेल्या सुनावणीत वादाचे मुद्दे निश्चित करण्यात आले असून महाराष्ट्र शासनाने ५ मुद्द्यांवर तज्ञ साक्षीदाराने नियुक्त्या केल्या आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयात दि.१२/०९/२०१४ रोजी दाव्यातील साक्षीपुरावे तपासण्यासाठी मा.कोर्ट मिशनवर यांची नियुक्ती केली आहे. न्यायालयाच्या आदेशांच्या पार्श्वभूमीवर मा.मुख्य सचिव यांनी दि.१८/०९/२०१४ व दि.१३/११/२०१४ रोजी आढावा बैठका घेऊन कार्यवाहीचे निदेश दिले आहेत.

साक्षीदारांची शपथपत्रे नोंदविण्यास मुदतवाढ मिळण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दि.०५/११/२०१४ रोजी एक अर्ज मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केला असून दि.१२/०९/२०१४ च्या अदेशात सुधारणा करण्यासाठी कर्नाटक शासनानेही अर्ज दाखल केला आहे.

दाव्याचे कामकाज गतिमानतेने होण्यासाठी जुने महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे वकील महोदयांसाठी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या असून मा. कोर्ट कमिशनर यांच्या सुनावण्यांसाठी दि.०८/०१/२०१५ रोजी तेथे एक विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे. दि.०१/०१/२०१५ रोजी Trial Lawyer यांची नियुक्ती करण्यात आली आहे तसेच वकील महोदयांच्या सहाय्यासाठी दि. २२/०१/२०१५ रोजी कनिष्ठ सहायक वकील यांची नियुक्ती विशेष कक्षात करण्यात आली आहे.

मा.कोर्ट कमिशनर यांच्यापुढे दि.०८/११/२०१५ व दि.०९/०१/२०१५ रोजी सुनावण्या झाल्या आहेत. महाराष्ट्र शासनाचे वकील महोदयांकडून साक्षीपुरावे नोंदविण्यासाठी साक्षीदारांची तयारी व अनुषंगाने आवश्यक कागदपत्रे गोळा करण्याचे काम प्रगतीपथावर असून त्यासाठी वकीलांच्या नवी दिल्ली व पुणे येथे सातत्याने बैठका झाल्या आहेत.

मूळ दाव्याची दि.०९/०१/२०१५ रोजी सुनावणी झाली असता तीन सदस्यीय खंडपीठामुळे प्रकरण चालविण्याचे मा.सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. तदनंतर दि.१३/०५/२०१५ व दि.०७/०७/२०१५ रोजी तारखा पडून सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे.

सीमावादीत भागातील मराठी भाषिकांवर होणाऱ्या अन्यायाबाबत मा.मुख्यमंत्री यांनी दि.३०/०६/२०१५ च्या पत्रान्वये मा.पंतप्रधान यांना अवगत केले असून सदर पत्राची मा.पंतप्रधान यांनी दखल घेतली आहे.

सीमावादीत भागातील मराठी भाषिकांवर होणाऱ्या अन्यायाच्या घटना निदर्शनास आणून तेथे Status Quo स्थिती राखण्याबाबत मा. सर्वाेच्च न्यायालयास विनंती करणारा इंटरलोकुटरी अर्ज दि.१४/०७/२०१५ रोजी महाराष्ट्र शासनाकडून दाखल करण्यात आला आहे. समन्वयक मंत्री यांनी दि.२५/०१/२०१६ रोजी कोल्हापूर येथे सीमा प्रश्नी आढावा बैठक घेतली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई उच्च न्यायालयाच्या नवीन इमारतीच्या विस्तारीकरणाबाबत

**(४३) ३२७३७ (२१-०१-२०१६). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.मुंबई उच्च न्यायालयाने न्यायालयाच्या नवीन इमारतीच्या विस्तारीकरणासाठी मुंबई विद्यापीठाच्या कालीना (सांताक्रुझ, मुंबई) येथील ३० एकर जागेची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेचे क्षेत्र मिठी नदीचे पाणलोट क्षेत्र म्हणून राखीव असल्याने त्यावर बांधकाम किंवा इतर विकास कामे होऊ शकत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या इमारतीच्या विस्तारिकरणासाठी शासन अन्य ठिकाणी पर्यायी जागा उपलब्ध करून देणार आहे काय वा त्यानुषंगाने केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१६) :**(१) मुंबई उच्च न्यायालयाच्या नवीन इमारतीच्या विस्तारीकरणासाठी उच्च न्यायालय प्रशासनाचा कलीना येथील ५० एकर जागेच्या मागणीचा प्रस्ताव आहे.

(२) हे खरे नाही.

(३) मुंबई उच्च न्यायालयासाठी न्यायमूर्तींची वाढीव दालने, कोर्ट रुम व कार्यालयासाठी फोर्ट, मुंबई येथील CTO इमारतीतील तळमजल्यावरील १८९५७.६१ चौ.फूट जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यासोबतच या CTO इमारतीतील पहिल्या मजल्यावर अतिरिक्त सुमारे १०००० चौ.फूट जागेचा तसेच MTNL इमारतीतील जागेचा उच्च न्यायालयाचा प्रस्तावदेखील उच्च न्यायालयाच्या विस्तारीकरणाच्या दृष्टीने शासनाच्या विचाराधीन आहे.

---

## मुंब्रा (जि.ठाणे) येथील महिलेने आपल्या १० दिवसांच्या मुलीची विक्री केल्याबाबत

**(४४) ३२८४० (२१-०१-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंब्रा (जि.ठाणे) येथे राहणारी शबाना उर्फ रुबिना साजिद शेख (वय वर्ष २५) या महिलेने ४ साथीदारांच्या मदतीने आपल्या १० दिवसांच्या मुलीची १० हजार रुपयात विक्री केल्याचे दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी राबोडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून चौकशी अंती कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

१० दिवसाच्या मुलीची नसून १० दिवसाच्या मुलाची विक्री केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) सदर प्रकरण पोलीस स्टेशन गु.र.नं. २९७/१५ भादवि सह कलम २७०, ३४ सह बालन्याय अधिनियम २००० कलम २३ प्रमाणे दि. ९/९/२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर्व पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. सध्या गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला येथील एस.आर.पाटील महाविद्यालयामध्ये एका विद्यार्थीनीची शाळेतील शिक्षकाने छेड काढल्याबाबत**

**(४५) ३५१२६ (२२-०१-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला येथील एस.आर.पाटील महाविद्यालयामध्ये एका विद्यार्थीनीची शाळेतील शिक्षकाने छेड काढून तिच्याशी अश्लील चाळे केल्याप्रकरणी पोलिसांनी राणे, मनवर व गणेश बोरगर या गुन्हेगारांविरुध्द गुन्हा दाखल केला असून यातील मनवर व गणेश बोरकर यांना अद्याप अटक करण्यात आलेली नसल्याचे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू आरोपींना अटक करण्यास पोलीस टाळाटाळ करीत असल्याने तात्काळ अटक करण्याबाबत विश्व हिदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१६) :**(१) फिर्यादीने तक्रार दिल्यावरून तीन आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन खदान येथे गु.र.नं. १५५/१५ कलम ३५४, ३५४ (अ), ५०४, ५०६, ५०७, ३४ भादवि सह कलम १२ लैंगिक अपराधापासून बालकाचे संरक्षण अधिनियम, २०१२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्ह्यातील आरोपी क्र. १ यांना अटक केली आहे, आरोपी क्र. २ व ३ यांना अटकपूर्व जामीन मंजूर झाला आहे.
(२) सदर गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यास पोलीसांनी कोणतीही टाळाटाळ केली नसून, आरोपी हे गुन्हा दाखल झाल्यापासून फरार होते. त्यांचा त्यांचे घरी तसेच त्यांचे नातेवाईकांकडे शोध घेण्यात आला असता आरोपी मिळून आले नाहीत.
विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकऱ्यांनी विदर्भ विकास महिला बालकल्याण या संस्थेला अकाला जिल्ह्यात समुपदेशन केंद्र चालविण्याकरिता देण्यात आलेल्या केंद्राची व संस्थेची मान्यता रद्द करण्यात यावी याकरिता निवेदन देण्यात आलेले आहे.
(३) पोलीस स्टेश खदान येथे गु.र.नं. १५५/१५ कलम ३५४, ३५४ (अ), ५०४, ५०६, ५०७, ३४ भादवि सह कलम १२ लैंगिक अपराधापासून बालकाचे संरक्षण अधिनियम २०१२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपी क्र. २ व ३ यांना अटकपूर्व जामीन मंजूर झाला आहे. आरोपी क्र.१ व ३ विरुध्द कलम १०७, ११६ (३) सीआरपीसी अन्वये प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आलेली आहे. सध्या गुन्हाचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे वृत्तपत्र विक्रेता संघाच्या न्यास बरखास्त करणेबाबत**

**(४६) ३५३०८ (२१-०१-२०१६). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे वृत्तपत्र विक्रेता संघाच्या (नोंदणी क्र. ३४५३/पुणे) वार्षिक सर्वसाधारण सभा अनियमितपणे होणे, हिशोब पत्रके वेळोवेळी दाखल न करणे, न्यासाच्या बदललेल्या पत्त्याबाबत विश्वस्तांनी बदल अर्ज दाखन न करणे, न्यासाचे स्थापनेपासून आजपावेतो कोणकोणत्या बँकामध्ये न्यासाच्या नावे खाती उघडण्यात आली आहेत इत्यादी प्रकरणी लोकप्रतिनिधी व नागरिकांच्या तक्रारींच्या अनुषंगाने गत दोन वर्षापासून सुरु असलेल्या चौकशीमध्ये काय आढळून आहे,

(२) असल्यास, संघाच्या अध्यक्षांनी अधिकाऱ्यांच्या संगनमताने खोटी कागदपत्रे सादर करुन न्यासाच्या नावे प्राप्त झालेल्या निधीतून विश्वस्तांनी १४ गुंठे जमीन सदस्यांच्या नावे खरेदी केलेली असून खरेदी मुल्यांकन व प्रत्यक्ष खर्च या रक्कमेत तफावत व अनियमितता दिसून आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आद्यपपर्यंत लेखी परिक्षण करुन घेण्यात आलेले नसल्याने याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय निष्पन्न झाले,

(४) तसेच निरिक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे यांना माहे मार्च, २०१५ तसेच चौकशी अहवाल दिनांक १८ एप्रिल, २०१५ व शासनाला दिनांक २ जून, २०१५ रोजी कळविलेली माहिती विचारात घेता या प्रकरणी सदरहू न्यास बरखास्त करुन दोषी असलेल्या संबंधितांविरुध्द कोणती कायेदशीर कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०२-२०१६) :**(१) सदर न्यासाने स्थापने पासून (सन २०००ते २००३ खेरीज) हिशेब ठेवले नसून ऑडिट रिपोर्ट दाखल केलेला नाही. न्यासाने गुंतवणूकी बाबत व बँक खात्याबाबत नोटीस काढून देखिल माहिती दिलेली नाही. तत्कालीन विश्रस्तांनी बेजबाबदारपणे बँक खाती उघडली असून ते न्यासाच्या नुकसानीस कारणीभूत असल्याचे आढळून आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) संस्थेने (सन २००० ते २००३ खेरीज) नोंदणी पासूनचे हिशोब ठेवले नसल्याने व ऑडीट रिपोर्ट दाखल केले नसल्याने निरिक्षकांच्या चौकशी नंतर ट्रस्टीविरुध्द स्वयंखुद कलम ४१ डी (अर्ज क्र. ५३/१५) विश्वस्त काढून टाकणेकामी व स्वयंखुद कलम ४१ इ अन्वय (अर्ज क्र. ७०/१५) प्रॉपटीचा दुरुपयोग होत असल्याचे प्रकरण सुरु आहे. कुठल्याही न्यायाच्या विश्वस्त मंडळास कायदेशिर प्रक्रियेचा अवलंब केल्याशिवाय बरखास्त करता येत नाही. निरीक्षक व सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या अहवालात तथ्य आढळल्यामुळे विश्वतांना

त्यांच्या पदावरुन काढून टाकणेची प्रक्रीया कलम ४१ ड अन्वये चालु असून ती प्रलंबीत आहे. या प्रकरणी संस्थेतर्फे कोणतेही म्हणणे दाखल नसल्यामुळे सदरील प्रकरण पुढील सुनावणीसाठी ठेवण्यात आले आहे. तसेच विश्वस्तावर फौजदारी कार्यवाही बाबत नोटीसा पाठविल्या आहेत.
(५) सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

---

**राज्यातील न्यायालयांचे कामकाज मराठीत होण्यासाठी कायदे आणि नियमांच्या प्रती मराठीत उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४७) ३६२८५ (२१-०१-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व कनिष्ठ न्यायालयातील कामकाज मराठी भाषेतून होण्याकरिता राज्य शासनाने १९९८ मध्ये अधिसूचना काढली आणि त्यानुषंगाने मा.उच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयांना किमान ५० टक्के निकाल मराठीत देण्याचे निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने मात्र आजतागायत कायदे आणि नियमांच्या प्रती मराठीत उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनास कायदे आणि नियमांच्या प्रती मराठी भाषेत रुपांतरीत करण्यासाठी किती कालावधी अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०२-२०१६) :**(१) होय.
(२) हे खरे नाही. राज्य शासनाने आतापर्यन्त ५८६ राज्य अधिनियम, ७८ नियम व १६६ केंद्रीय अधिनियम प्राधिकृत पाठाच्या स्वरुपात मराठीत उपलब्ध करुन दिलेले आहेत.
(३) व (४) निरंक.

---

**सांगली जिल्ह्यातील (ता.शिराळा) हुतात्मा स्मारके भग्नावस्थेत असल्याबाबत**

**(४८) ३६९३३ (२१-०१-२०१६). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील (ता.शिराळा) स्वतंत्र लढ्यातील हुतात्माच्या स्मरणार्थ लाखो रुपये खर्च करुन बांधण्यात आलेली चार हुतात्मा स्मारके भग्नावस्थेत असून स्थानिक जनतेकडून त्यांचा गैरवापर करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेली सदरहू हुतात्मा स्मारके, वाचनालय, ज्येष्ठ नागरिक संघटनांचे कार्यालय अन्यथा इतर सेवाभावी संस्थांना वापराकरिता देण्यात यावी जेणेकरुन त्यांची निगा राहून जनतेची सतत ये-जा राहील अशी मागणी स्थानिक जनतेकडून करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, या हुतात्मा स्मारकांचे जतन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०२-२०१६)** :(१) स्मारकांचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे, हे खरे आहे, सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यातील (१) मांगरुळ (२) बिळाशी (३) मणदूर व (४) आराळा या ठिकाणी ही हुतात्मा स्मारके आहत. ही गावे जंगल व दूर्गम भागातील आहेत. त्या गावांची लोकसंख्या कमी आहे सदर स्मारकांचा जनतेकडून गैर वापर होत नाही.
(२) अशी मागणी जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झालेली नाही.
(३) राज्यातील हुतात्मा स्मारकांची दुरुस्ती/ देखभाल करण्याकरिता प्रत्येक वर्षी ठराविक निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी धर्मादाय संस्थांच्या हॉस्पिटलमधील रिकाम्या बेडची माहिती धर्मादाय आयुक्तालयाच्या संकेत स्थळावर टाकण्याबाबत**

**(४९) ३७८१९ (२१-०१-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी धर्मादाय संस्थांच्या हॉस्पिटलमधील रिकाम्या बेडची माहिती धर्मादाय आयुक्तालयाच्या संकेत स्थळावर टाकण्याचे आदेश मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या दरम्यान धर्मादाय आयुक्त यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आदेशानुसार धर्मादाय आयुक्तांच्या संकेत स्थळावर टाकावयाची माहिती अद्ययावत होत नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त माहिती संकेतस्थळावर नियमित अद्ययावत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०१६)** :(१) होय. धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या संकेत स्थळाचे मा.मुख्यमंत्री यांचे शुभहस्ते दिनांक २४ ऑगस्ट, २०१५ रोजी उद्घाटन झाले असून या कार्यालयाच्या ई-गर्व्हनन्स या कार्यक्रमा अंतर्गत रुग्णालय मॉड्यूल गो-लाईव्ह करण्यात आलेले आहे.
(२) होय. मा.तदर्थ संयुक्त समितीच्या दि.२७/१०/२०१५ रोजीच्या बैठकीत सदर बाब निदर्शनास आली.

(३) हॉस्पिटल मॉड्युलमध्ये ज्या धर्मादाय रुग्णालयानी अद्याप माहिती भरलेली नाही त्यांचे विरुध्द महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ६६ ख अन्वये कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्हयात स्वतंत्र निवड मंडळ स्थापन करण्याबाबत**

**(५०) ३९१५१ (२१-०१-२०१५). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हा हा अतिशय दुर्गम, नक्षलग्रस्त, आदिवासीबहुल, उद्योग विरहीत व शिक्षणाबाबत मागासलेला तसेच विकासापासून वंचित असलेला जिल्हा आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जिल्हयातील तरुणवर्ग शिक्षणाच्या दृष्टीने स्पर्धात्मक परीक्षांमध्ये मागे असून त्यांना नोकरीमध्ये संधी मिळत नसल्याने गडचिरोली जिल्हयाच्या विकासाकरिता स्वतंत्र निवड मंडळाची स्थापना करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(३) तसेच उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०१६) :**(१), (२) व (३) गडचिरोली जिल्हा नक्षलग्रस्त म्हणून घोषित करण्यात आला असून तेथील भौगोलिक व सामाजिक परिस्थिती लक्षात घेऊन गडचिरोली जिल्हयातील शासकीय कार्यालयातील “गट क” व “गट-ड” संवर्गातील पदांवर देणेबाबातचे आदेशा शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ०२/०२/२०११ अन्वये देण्यात आले आहेत. त्यानुसार जिल्हयातील स्थानिक बोलीभाषा अवगत असणाऱ्या तसेच जिल्हयाची भोगोलिक व अन्य स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्याच्या सूचना आहेत.

गडचिरोली जिल्हयातील शासकीय कार्यालयांतील गट-क व गट-ब संवर्गातील पदांवर नियुक्तीसाठी अनुसूचित जमातींसाठी २४% वाढीव आरक्षणही विहित करण्यात आलेले आहे.

मा.राज्यपाल महोदयांनी दि. ९/६/२०१४ व दि. १४/०८/२०१४ व दि ३१/१०/२०१५ च्या अधिसूचनांन्वये, अनुसूचित क्षेत्रामध्ये राहणाऱ्या आदिवासींच्या कल्याण व प्रगतीकरिता , अनुसूचित क्षेत्रामधील विशिष्ट १२ संवर्गातील रिक्त असलेली सरळसेवेची पदे स्थानिक अनुसूचित क्षेत्रातील उमेदवारांमधूनच भरण्याचे आदेश दिलेले आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क व गट-ब (अराजपत्रित) ही जिल्हास्तरीय पदे नामनिर्देशनाने भरण्याकरीता जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय निवड समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा निवड समिती, गडचिरोली कार्यरत असून या समितीकडून गडचिरोली जिल्हयातील गट-क व गट-ब (अराजपत्रिका) या संवर्गातील

सरळसेवेच्या भरतीकरीता जाहिरात प्रसिध्द केली जाते आणि अर्हताप्राप्त उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्यात येचून गडचिरोली जिल्ह्यातील स्थानिक उमेदवारांसाठी करण्यात आलेल्या उपरोक्त तरतुदीच्या आधारे व विहित पध्दतीने गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड करण्यात येत असल्याने गडचिरोली जिल्ह्याकरीता स्वतंत्र निवड मंडळाची स्थापना करण्याचा प्रस्ताव विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.